**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – सोमनाथ मंगळा पटेकर

माझे वय ४० वर्षे व्यवसाय पोलीस नाईक/ वाहन चालक.

राहणार अकोले पोलीस ठाणे, ता.अकोले, जि.अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.**

**१.** दिनांक २५.०५.२०२१ रोजी रात्री २३.०० ते पहाटे ०५.३० वाजेपर्यंत मी व पो.कॉ.संदीप भोसले असे मिळून सरकारी वाहन क्रमांक एम.एच.१६–सी.व्ही.०८९३ मधून अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गस्त घालत होतो. त्यावेळी आम्हाला पोलीस ठाणे अंमलदार सहा.पोलीस फौजदार सय्यद यांनी फोन करून कळविले की, अहमदनगर येथील कंट्रोल रुम मधून फोन आला आहे की, मार्केट यार्ड येथे वाळू भरलेला एक टेम्पो उभा आहे. त्यावेळी आम्ही त्या रस्त्यावर पेट्रोलिंग करीत होतो. आम्हाला तो टेम्पो दिसून आला. तो टेम्पो टाटा कंपनीचा मॉडेल ४०७ नोंदणी क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ असा होता. त्या टेम्पोच्या चालकाला आम्ही त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शुभम संजय चव्हाण, रा.कारखाना रोड असे सांगितले. आम्ही त्या टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू होती. आम्ही त्या चालकास परवान्याबाबत विचारले असता त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. त्यामुळे, आम्ही त्या चालकाला टेम्पो व त्यातील वाळू सह अकोले पोलीस ठाणे येथे घेवून आलो. पो.कॉ.श्री.संदीप भोसले यांनी चालक शुभम संजय चव्हाण याचेविरूध्द फिर्याद दाखल केली. पोलिसांनी माझे तपास टिपण नोंदविले आहे. मी आरोपी शुभम संजय

चव्हाण याला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एन.बी.वाकचौरे यांचे मार्फत–**

२. हे म्हणणे खरे आहे की, अकोले पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये समशेरपूर बीट व कोतुळ बीट हे स्वतंत्र बीट आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रात्रीचा गस्त घालण्यासाठी जाण्यापूर्वी कोणत्या बीटमध्ये गस्त घालावयाचा आहे, याबाबत आदेश झालेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, अकोले पोलीस ठाणे येथे एकच सरकारी वाहन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहनाचे लॉन्ग रजिस्टर जतन करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहन पोलीस ठाण्यातून बाहेर नेताना व परत आल्यानंतर त्याची नोंद स्टेशन डायरीला करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २५.०५.२०२१ रोजी रात्री २३.०० ते दिनांक २६.०५.२०२१ पहाटे ०५.३० वाजताच्या दरम्यान गस्त घालण्यासाठी जाण्यापूर्वी व परत आल्यानंतर आम्ही त्याच्या नोंदी स्टेशन डायरीला केल्या होत्या. ठाणे अंमलदार सय्यद यांनी पोलीस ठाणे येथील लॅन्ड लाईन फोनवरून श्री.भोसले यांचे मोबाईल फोनवर फोन केला होता.

३. ज्या ठिकाणी गाडी मिळून आली, त्यावेळी त्या ठिकाणी पंचनामा केला नव्हता. आम्ही आरोपीला मुद्देमालासह ठाणे अंमलदार यांचेकडे देताना पंचनामा केलेला नाही. आम्हाला ती गाडी पहाटे ०४.१५ वाजताचे दरम्यान मिळून आली होती. आम्हाला ज्या ठिकाणी गाडी मिळाली, ते ठिकाण अकोले पोलीस ठाणे पासून वाहनाने सुमारे १० मिनिटांच्या अंतरावर आहे. आम्ही अकोले पोलीस ठाणे येथे पहाटे ०४.२५ वाजताचे दरम्यान पोहोचलो. पहाटे ०४.३५ वाजताचे सुमारास मी व

पो.कॉ.श्री.भोसले पुन्हा गस्त घालण्यासाठी गेलो. त्यावेळी आम्ही अकोले शहरात गस्त घातला. हे म्हणणे खरे आहे की, सुमारे ०५.३० ते ०६.०० वाजताचे दरम्यान आम्ही गस्त घालून परत आलो. हे म्हणणे खरे आहे की, आमची ड्युटी संपल्यामुळे आम्ही घरी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, रात्रीची ड्युटी केल्यामुळे मी दिनांक २६.०५.२०२१ रोजी अकोले पोलीस ठाणे येथे कामासाठी आलेलो नव्हतो. तपासिक अंमलदार यांनी माझा जबाब दिनांक २६.०५.२०२१ रोजी नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी मला फोन करून अकोले शहराचे बीट अंमलदार यांचे ऑफीसमध्ये माझा जबाब नोंदविला.

४. आम्ही अकोले पोलीस ठाणे येथे आरोपी व मुद्देमाल दिल्यानंतर पुन्हा गस्त घालण्यासाठी जाण्यापूर्वी त्याची नोंद आम्ही स्टेशन डायरीला केली होती. मी आजरोजी न्यायालयात आल्यानंतर माझा जबाब वाचून पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याप्रमाणे आजरोजी न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.15 18:33:09 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १५.०९.२०२५**